महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 093. प्रिन्सिपल कार्यालय : 4,4 (ऐ) 12 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-1, कफ परेड, मुंबई 400 005.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:022-2687 0027/52/54/73
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +91-22-22151451/52/53
www.midcindia.org

जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/A76928 दिनांक: 23/01/2023

## परिपत्रक

**विषय : IT/ITES, Nano Technology,Bio-Tech, Pharma, Robotics, Industries-४.०, IIT Township,Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादीच्या पुनर्जीवनासाठी योजना लागू करणेबाबत...**

महामंडळाने दिनांक १०.१२.२०२०,२४.०५.२०२१,२६.११.२०२१ तसेच दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, न्यायालयीन बाबी, उद्योग अवसानयात जाणे, आर्थिक मंदी इत्यादीमुळे महाराष्ट्रात उद्योग बंद पडलेले आहेत किंवा काही कारणास्तव जे उद्योजक उद्योग सुरु करु शकले नाहीत, अशा २०,००० चौ.मी. व त्यावरील क्षेत्राच्या भूखंडधारकांना त्यांचे भूखंड जे उद्योजक ५०० कोटी व त्यापेक्षा जास्त गुंतवणूक करु इच्छितात त्यांना IT / ITES, Nano Technology, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्वपूर्ण प्रकल्प इत्यादीच्या पुनर्जीवनासाठी योजना निर्गमित केलेली होती.

वरील पार्श्वभूमीवर महामंडळाने दिनांक २९.१२.२०२१ रोजीच्या परिपत्रकामध्ये दिनांक २१.०३.२०२२ अन्वये विषयांकित उद्योगांच्या पुनर्जिवनासाठी लागू करण्यात आलेली योजना दिनांक ३१.०३.२०२२ पर्यन्त लागू करण्यात आलेली असून परिपत्रक निर्गमित केल्यापासून उद्योजकांना फक्त १० दिवसांचा कालावधी मिळाला असल्यामुळे सदर योजना उद्योजकांना अवगत न झाल्याने ते योजनेचा लाभ घेवू शकलेले नाहीत. सबब सदर योजनेचा कालावधी वाढविण्यात यावा. तसेच, दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकातील अ.क्र. २ नुसार ५०० कोटी गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना ५ वर्षांचा कालावधी देण्यात आलेला आहे. सदरहु कालावधी जे भूखंडधारक स्वतः त्यांच्या भूखंडावर IT / ITES, Nano Technology, Bio-Tech,

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center तसेच इतर महत्त्वपूर्ण प्रकल्प विकसीत करणार आहेत, त्यांनाही लागू करण्यात यावा व सदर पुनर्जिवन योजना Pharma प्रकल्पांकरिता देखील लागू करावी, अशी उद्योजकांकडून मागणी होत आहे.

सद्यःस्थितीत चीन, युरोप व अमेरिका येथे कोविड-१९ महामारीची पुनःश्च सुरुवात झालेली असुन सदर परिस्थिती दिवसेंदिवस अधिक गंभीर होत आहे. तसेच, महामंडळाने दिनांक २१.०३.२०२२ रोजी परिपत्रक निर्गमित केलेले असून त्यानुसार परिपत्रक निर्गमित केल्यापासून उद्योजकांना फक्त १० दिवसांचा कालावधी मिळाला आहे. प्रकरणी, परिपत्रक अवगत होणे, कागदपत्र सादर करणे, त्याची छाननी होणे इत्यादिकरीता लागणारा कालावधी विचारात घेता, सदरहू योजनेचा कालावधी वाढविणे तसेच दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकातील अ. क्र. २ नुसार ५०० कोटी गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना देण्यात आलेला ५ वर्षाचा कालावधी जे भूखंडधारक स्वतः त्यांच्या भूखंडावर IT/ITES, Nano Techonlogy, Bio-Tech, Robotics, Industries-४.०, IIT Township, Data Center भूखंड स्वतः विकसित करतील व प्रकल्पातील गुंतवणूक ५०० कोटी किवा जास्त असेल त्यांनाही दिनांक २९.१२.२०२१ च्या परिपत्रकातील अ. क्र. २ नुसार चटई निर्देशांक वापर करण्याकरीता कालावधी देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर योजना Pharma प्रकल्पांकरिता देखील लागू करणे आवश्यक असल्याने सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन ठराव क्रमांक ६४८९ पारीत करण्यात आला.

त्याअनुषंगाने परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/इ-५५१०५, दिनांक २६.११.२०२१ मधील तरतुदींस मुदतवाढ देणे व परिपत्रक क्रमांक ए-९७३६१, दिनांक २१.०३.२०२२ चे परिपत्रकात खालीलप्रमाणे सुधारणा करणेत येत आहे. तसेच सदर बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता प्रस्तुतची योजना लागू करण्याबाबत सदस्य मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केल्याने सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. सदरहु योजना माहे ३१ मार्च, २०२३ पर्यंतच कार्यान्वीत राहिल आणि कुठल्याही परिस्थितीत सदर योजनेस मुदतवाढ दिली जाणार नाही. सदरहू योजना Pharma प्रकल्पांनादेखील लागू राहील.

२. जे भूखंडधारक स्वतः त्यांच्या भूखंडावर IT/ITES, Nano Techonlogy, Bio-Tech, Pharma,Robotics, Industries- ४.०, IIT Township, Data Center तसेच

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

इतर महत्वपूर्ण प्रकल्प विकसित करणार आहेत, तसेच त्यांची प्रकल्पामधील गुंतवणूक ५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा भूखंडधारकांस सदरहू भूखंडास मुदतवाढ शुल्क लागू असल्यास अशा प्रकरणी मुदतवाढीसाठी देय असणाऱ्या एकूण मुदतवाढ शुल्काच्या एकूण ३० टक्के आकारणी करण्यात यावी. तसेच, पुढील मुदतवाढ ५ टक्के ना परतीची अतिरिक्त रक्कम आकारुन देण्यात यावी.

३. प्रकल्पातील गुंतवणूक ५०० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर त्यांना पहिल्या दोन वर्षात २० टक्के चटई निर्देशाकांचा वापर करणे व उर्वरित २० टक्के चटई निर्देशांक विभागानुसार उर्वरित कालावधीमध्ये किंवा ३ वर्षे यापैकी जास्तीचा असेल त्यामध्ये करणे अनिवार्य राहील.

४. ज्या भूखंडामधील हस्तांतरीत कंपनीची गुंतवणूक २५०० कोटी व त्यापेक्षा जास्त असेल तर अशा हस्तांतरण करुन घेणाऱ्या कंपनीस भूखंड अनऔपचारीक हस्तांतरण प्रकरणात वापरलेल्या चटई निर्देशकानुसार (FSI) खालीलप्रमाणे सुधारित हस्तांतरण शुल्क आकारण्यात यावे.

| अ.क्र. | चटई निर्देशकांचा वापर | आकारावयाचे हस्तांतर शुल्क |
|---|---|---|
| १ | ७.५० टक्के व त्यापेक्षा कमी | १५ टक्के |
| २ | ७.५० टक्के पेक्षा जास्त व १० टक्कयापेक्षा कमी | ७.५० टक्के |
| ३ | १० टक्के व त्यापेक्षा जास्त | ३ टक्के |

सदरहू कंपनीने त्याच्या प्रकल्पात गुंतवणूक केल्याबाबत सनदी लेखापालचे (CA Certificate) प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर हस्तांतरीत कंपनीने त्याच्या प्रकल्पात नमूद गुंतवणूक (२५०० कोटी व त्यापेक्षा जास्त) नमूद कालावधीत केली नाही तर हस्तांतरी कंपनीस हस्तांतरामध्ये दिलेली सूट व्याजासह वसूल करण्यात यावी.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

( ए. एस. रंगा नायक )
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.

(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)

(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,

(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,

(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,

(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.

(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,

(९) सर्व औद्योगिक संघटना

(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in